Lalita Gandbhir
65 Oxford Rd.
Newton, MA 02459
U.S.A.
(One time serial rights)

# गराज सेल

मी शनिवारी सकाळी उठून चहा करत होते. तोच नवरा वर्तमानपत्राबरोबर एक हिरवा कागद घेऊन स्वैपाकघरात आला. “ही बघ आपल्याला नोटिस आलीय. येत्या शनिवारी मरी रोडवर गराज सेल करण्याचे योजले आहे. सर्वांनी सकाळी दहा वाजता गराज सेलची तयारी करावी.”

मी तावातावाने म्हटलं, “हे कुणी ठरवलं? गराज सेल करण्याआधी तो दिवस सर्वांना सोयिस्कर आहे की नाही हे विचारावं का नाही?”

“त्या बाबतीत कुणाचं एकमत होणार आहे का?”

“तू काही म्हण.” मी ठासून सांगितलं, “या शनिवारी मी गराज सेल करणार नाही.”

“का नाही? गराज सेल हा घरातल्या कचरणीचा गारबेज डंपच्या आधीचा स्टॉप असतो. तू सेल कर. घरातला जंक कमी होईल.”

अशी बडबड चालू असताना मोठी उठून खाली आली. तिने नोटिस वाचली आणि “मी गराज सेल करणार” म्हणून ती उत्साहाने उड्या मारू लागली. मग धाकटीला उठवायला गेली.

तिच्या उत्साहाला आलेलं उधाण पाहून नवरा म्हणाला, “तू नाही तर तुझी लेक करेल गराज सेल.”

धाकटीही उठून खाली आली. ब्रेकफास्ट खाताना त्या दोघींची कुठल्या वस्तू केवढ्याला विकायच्या याविषयी चर्चा सुरू झाली.

“ती बार्बी एक डॉलरला”

“तिचा हात मोडलाय”

“मग डॅडी जोडून देईल”

"त्या हाताचे तीन तुकडे झालेत"

"ती एका डॉलरला नाहीच विकली गेली तर आपण किंमत कमी करू."

"तिचे कपडे फाटलेत"

"मग मम्मी नवे आणेल"

मी म्हटलं, "चार डॉलरचे कपडे आणायचे. बार्बी एका डॉलरला विकायची. ह्या हिशोबाने फायदा तर नाहीच उलट तोटाच होणार."

मोठी म्हणाली, "कपड्यांना तुझे पैसे खर्च होणार आणि एक डॉलर मला मिळणार. म्हणजे माझा फायदाच की नाही?"

नवरा हसायला लागला, "कॅपिटॅलिस्ट कार्ट्या. स्वतःची तुंबडी भरली की झालं."

"तुंबडी म्हणजे काय?"

आम्ही दोघेही अडखळलो.

शेवटी मी सांगितलं, "तुंबडी म्हणजे पर्स."

"म्हणजे तू रोज तुंबडी घेऊन कामाला जातेस."

नवरा हसू लागला. मी त्याला म्हणाले, "मग तू सांग ना तुंबडी म्हणजे काय ते."

एव्हाना मुली तुंबडी विसरून गराज सेलच्या चर्चेत गुंतल्या होत्या. सिरिअल संपवून त्या गराज सेलसाठी खेळणी उपसायला निघाल्या तेव्हा नवऱ्याने त्यांना दरडावून सांगितलं, "तुमची खेळणी, कपडे, सी.डी.ज् असलं तुम्ही खुशाल विका. पण दुसऱ्यांच्या सेलला जाऊन जंक गोळा करून आणलात तर मी तो टाकून देईन."

त्या दोघी ऐकलं न ऐकलंसं करून बेपत्ता झाल्या.

परिणामी नवरा वैतागला, "कश्या माझ्याकडे दुर्लक्ष करून गेल्या बघ. आता पुढच्या शनिवारी तू जेवढं सामान काढून टाकशील तेवढंच ह्या दोघी घरात आणतील. अमेरिकेत गराज सेलवाल्यांची पॅरलल

इकॉनॉमी झालीय. एका गराज सेलमधला माल दुसऱ्यात, तिसऱ्यात व चवथ्यात सर्क्युलेट होत राहतो.” असं म्हणत तो पेपर उचलून बेसमेंटमधे नाहीसा झाला.

रविवारी व सोमवारी शेजारणी भेटल्या. सगळ्या गराज सेलबद्दलच बोलत होत्या. एकूण गराज सेलची योजना यशस्वी होणार अशी चिन्हं दिसू लागली होती. मी मन बदललं. आणि गराज सेल करण्याचं ठरवलं.

मुलींचाही उत्साह भरून वाहात होता. एव्हाना त्यांनी त्यांचे बरेचसे कपडे, खेळणी, पुस्तकं त्यांच्या खोल्यांत व लिव्हिंगरूममध्ये पसरली होती. त्यांची किंमत किती येईल याची चर्चा सतत चालू होती. वस्तू विकल्या नाहीत तर किंमती कमी करून सेल किती वाजता लावायचा व सेलमधे किंमत किती कमी करायची ह्याचाही निर्णय घेतला जात होता. मधूनच धाकटी येऊन “तुझ्या दोन उशा मी आमच्यात विकायला ठेवू का?” अशा धर्तीचे प्रश्न विचारत होती.

नवरा म्हणाला, “ह्या मुलींच्यात हे कॅपिटॅलिस्ट धंदेवाईकाचं रक्त कुठून आलं? ह्या दोघी मराठी वाटतच नाहीत.”

मी म्हटलं, “अमेरिकेत राहतात ना त्या! वाण नाही पण गुण लागलाय.”

गुरुवारी मीही गराज सेलसाठी नवऱ्याच्या भाषेत ‘कचरण’ गोळा करून वस्तूंवर किंमतीच्या चिठ्ठ्या लावायला सुरवात केली. तेव्हा मला मुलींचा प्रॉब्लेम समजला. मला पण किंमती काय ठेवाव्यात हे समजेना. नवऱ्याचा सल्ला घेण्यात अर्थ नव्हता. तो आरामात खुर्चीवर बसून हसत माझी खाडाखोड बघत होता. शेवटी न विचारता त्याने सल्ला दिलाच. “तू असं कर, एका बॉक्सात हे सगळं सामान भर आणि वर चिठ्ठी लाव “फ्री”! बघू कोणी नेतं का? कुणीच नेलं नाही तर कचऱ्यात बॉक्सच्या बॉक्स टाकायला सोपं! नाही का?”
मग तो हँ हँ करत म्हणाला, “तसं नको, ‘एक वस्तू नेली तर एक डॉलर बक्षीस’ अशी चिठ्ठी लाव.”

मी म्हणाले, “तुझा या गराज सेलशी संबंध नाही. तेव्हा गप्प बस. तुझी फुकट करमणूक होतेय त्याबद्दल ताशी वीस डॉलर या रेटने पैसे टाक.”

गराज सेलचा दिवस उजाडला. दहा वाजता सेल सुरू होणार होता. मी आठ वाजता, उठावं का नाही याचा विचार करत पडून होते. तोच दरवाजावरची बेल वाजली. उठून बघते तर दरवाजात एक फुलाफुलांचा सनड्रेस, हिरवेपिवळे प्लॅस्टिकचे दागिने व त्याच रंगाची स्ट्रॉ हॅट घातलेली मध्यमवयीन बाई उभी होती. तिने तोंडावर थापलेल्या रंगरंगोटीकडे मी आ वासून बघत असताना साधारण तशाच अवतारातली लालपांढरे कपडे घातलेली आणखी एक बाई आमच्या घराच्या दिशेने येऊ लागली.

"मेरी इज कमिंग. क्विक! डू यू हॅव एनी आयटेमस् यू इनहेरिटेड फ्रॉम यूवर ग्रॅंड ऑर ग्रेट ग्रॅंड पेरेंटस्?"

माझ्या जिभेवर तिरसट उत्तरं आली. "आहेत ना! पण इंडियात!" किंवा "माझ्या चेहेऱ्याकडे बघ. माझे आजी आजोबा इथे राहणारे नव्हते. हे माझ्या चेहेऱ्यावर देवानेच लिहून ठेवलंय."

तेव्हढ्यात मला एक कल्पना सुचली. मी दोन आठवड्यापूर्वी एका गराज सेलमधे एक जुनाट दिसणारा, रंग उडालेला लाकडी ट्रे दोन डॉलरला घेतला होता. तो मुलींना रंगवण्यासाठी म्हणून मी आणला होता. तोच या बाईला दाखवावा.

"कम ऑन इन" म्हणत मी दरवाजा बंद केला आणि पोटमाळ्यावरून शोधून ट्रे आणला. एखादा हिरा पारखून घ्यावा तसा ती बाई तो उलटासुलटा करून बघू लागली. आता ही बाई बहुतेक मॅग्निफाइंग लेन्स काढणार असा विचार माझ्या डोक्यात घोळू लागला.

"तीन डॉलर देते" ती बाई म्हणाली.

"दहा" मी म्हटलं.

असं करता करता सातवर सौदा झाला.

ट्रे घेऊन ती रंगीत बाई गेल्यावर मी स्वतःशीच म्हटलं, "दोन डॉलरवर पाच डॉलर येवढा जर धंद्यात मी फायदा करून घेतला तर लवकरच मी बिलियोनर होईन!"

असं म्हणत मी परत फिरते न फिरते तोच बेल वाजली. मेरी होती हे मी ओळखलंच. एव्हाना तिला काय विकायचं हे मी ठरवलंही होतं. दुसऱ्या एका गराज सेलमधे मी एक प्लॅटर घेतली होती. अख्खे दोन डॉलर तिच्यासाठी मोजले होते. ती मेरीला दाखवायची असा मी निर्णय घेतला.

मी दरवाजा उघडला आणि मेरीने ग्रँडपेरेंटस् वगैरे सुरू करण्याआधीच म्हटलं, “वेट. आय हॅव समथिंग फॉर यू.”

मी परत पोटमाळ्यावर जाऊन ती प्लँटर आणली. मेरीने हिरेपारख केली आणि म्हणाली, “पाच डॉलर देते” मी एव्हाना थोडी निर्ढावले होते. म्हटलं, “पंधरा हवेत.” असं करत सौदा बारावर तुटला.

“स्टॉक्स्च्या फायद्याचा विचार नेहमी परसेंटेजमधे करायचा” असं नवऱ्याने माझ्या डोक्यात घुसवलं होतं. (मी शंभरावर एकशेपाच मिळाले तर पाच रुपये - डॉलर फायदा असा हिशोब करते. तो म्हणतो तसं नाही. परसेंटेज बघायचं.) मी “दोन डॉलरवर पाच” आणि “दोन डॉलरवर दहा” म्हणजे किती परसेंट फायदा?” हा हिशोब करत किचनकडे वळले. तोच परत बेल वाजली. आता तिसरी रंगरंगोटीवाली आली असणार असा विचार करत मी दरवाजा उघडला तर दरवाजात शेजारची जोनी उभी. “हे काय? तू अजून नाइट गाऊनमधे! एव्हाना तू गराज सेलच्या वस्तू मांडायला सुरवात करायला हवी होतीस. तुझ्या मुली बघ कशा सगळ्या वस्तू मांडून बाहेर बसल्यात.”

मी आता बाहेर दृष्टीक्षेप केला. माझ्या कॅपिटॅलिस्ट कार्ट्या त्यांच्या सगळ्या वस्तू एका ब्लँकेटवर व्यवस्थित मांडून बसल्या होत्या. सकाळी आवाज न करता उठून त्यांनी हा उद्योग केला होता. एरवी शनिवारी बारा वाजेपर्यंत लोळत पडलेल्या असतात.

अजूनी झोपेत असलेला माझा मेंदू मल्टिटास्किंग करायला तयार नव्हता. परिणामी मुलींकडे लक्ष जाताच मी जोनीला विसरले. ते तिच्या लक्षात आलं असावं. मला हलवत ती मिनिटाला १०० मैलाच्या गतीने बोलू लागली. “तू, मी आणि लिंडा यार्ड सेलला गेलो होतो. तेव्हा तू आणि मी सारख्याच दिसणाऱ्या प्लँटरस् घेतल्या होत्या. ती तुझी प्लँटर मला हवीय.”

तिने प्लँटरचं नाव काढताच माझ्यातला पुणेरीपणा प्लस रत्नागिरीचं रक्त जोडीने उफाळलं. मेंदू पूर्णपणे जागृत झाला.

मी निष्पापपणे विचारलं, “कशाला ग?”

“त्या अँटिकवालीला विकायला.”

"ती मी कधीच तिला विकली."

"ह्या बावळटीला हे कसं सुचलं?" असे भाव जोनीच्या चेहेऱ्यावर उमटले.

ती प्लॅटर विकल्याच्या आनंदात मला जोनी पुढे काय विचारणार हा विचार सुचला नाही.

"केवढ्याला?"

"बारा डॉलरला" मी बेसावधपणे खरं ते बोलून गेले.

जोनी जाताच मी केलेली चूक माझ्या लक्षात आली. जोनी आता, "माझी तुझ्यासारखीच प्लॅटर मी तू विकलीस ना त्याच्या दुप्पट किंमतीला विकली" म्हणून बढाई मारणार हे स्पष्टच होतं. "मी प्लॅटर बारा डॉलरला विकली असं न म्हणता पंचवीस डॉलरला विकली असं खोटंच सांगायला हवं होतं" असा विचार माझ्या मनात आला.

मग असा कद्रू विचार माझ्या डोक्यात आला म्हणून मी स्वतःवर वैतागले. सकाळपासून घडलेल्या घटनांचा विचार केला तर बोहारणीशी हुज्जत घालणाऱ्या आणि "साबुदाणे मी कसे कमी भावात मिळवले?" म्हणून बढाई मारणाऱ्या चाळकरी बायकात आणि माझ्यात काय फरक होता?

मला स्वतःवर चिडचिड करायला फार वेळ मिळाला नाही. नवरा उठून खाली येत म्हणाला, "तुझ्या लेकी बघितल्यास का? सकाळी भल्या पहाटे उठून, कपडे बदलून, ब्रेकफास्ट घेऊन शांतपणे आवाज न करता बाहेर दुकान लावून बसल्या आहेत."

नवऱ्याने "मी शनिवारी कुठेतरी नष्ट होणार" म्हणून धमकी दिली होती पण तो घरातच कडमडत होता. बहुतेक त्याच्या दोन कॅपिटॅलिस्ट लेकींचं व्हेंचर बघून त्याला मजा येत असावी.

मी घाईघाईने पोटात सिरियल ढकललं व यार्डमधे नेण्यासाठी गराज सेलच्या वस्तू दरवाजाकडे नेऊन ठेवू लागले. नवरा सोयिस्करपणे अंघोळीला गेला. एक बॉक्स उचललं ते जड होतं. पाठीत एकदम सणक आली. मी थांबले. "खरंच मला हे नसते उद्योग करायला कुणी सांगितलं होतं?" वगैरे विचार करून परत तेच उद्योग करू लागले. सामान हलवल्यावर वर जाऊन कपडे बदलून आले व सामान यार्डमधे नेण्याच्या कामाला लागले. मोठी उत्साहाने पुढे आली व मदत करू लागली. पण अधे मधे तिची गिऱ्हाइकं येत होती. (गिऱ्हाइकं

म्हणजे रस्त्यावरची व आसपासची मुलं.) गिऱ्हाइक आलं की ती सामान टाकून विक्रीच्या कामाला जात होती. खरं म्हणजे धाकटी दुकान संभाळत होती पण मोठीचा विश्वास बसत नव्हता. त्यांच्या दुकानातून पाच आणि दहा सेंटसाठी घासाघीस चाललेली माझ्या कानावर येत होती.

मी माझ्या वस्तू पसरलेल्या चादरीवर मांडत त्यांची चर्चा ऐकत होते.

वस्तू मांडल्यावर मी रस्त्यावरून नजर फिरवली. एरवी शांत असणाऱ्या आमच्या रस्त्याची मंडई झाली होती. प्रत्येक घरासमोर टेबल, चादरी यांच्यावरती वस्तू ठेवलेल्या होत्या. स्त्रीपुरुष, मुलंमुली घरातून बाहेर धावपळ करत होते. मुलांचा उत्साह तर दुथडी भरून वाहत होता. इतर मुलांनी विकायला ठेवलेली खेळणी बघत ते हिंडत होते. काहीजण खेळणी विकत घेण्याच्या प्रयत्नात होते.

मी घड्याळाक्डे नजर टाकली. पाच मिनिटात ही बाजारपेठ उघडणार होती. पण आधीच अनोळखी कारस् व स्त्रीपुरुष रस्त्यावर यायला सुरवात झाली होती.

लिंडा धावत आली, "पार्किंग कमी पडणार आहे. रस्त्यावरच्या गाड्या ड्राइव्हवेत हलवा" म्हणून सांगत होती.

मी रस्त्याकडे नजर टाकली. नवऱ्याची कार रस्त्यावर होती. त्याला "ती हलव" म्हणून सांगण्याचा मला मोह झाला. पण तो काय उत्तर देणार हे ओळखून मी तो आवरला.

दहा वाजता नवराच घरातून एक टेबल घेऊन बाहेर आला. ते मुलींना देऊन तो परत घरात गेला व पेपर कपस् व एका मोठ्या जगमधे लेमोनेड भरून त्याने आणलं. तोपर्यंत मुलींनी टेबलावर टेबलक्लॉथ पसरला होता. त्यावर पेपर कपस् ठेवून त्यांनी शेजारी लेमोनेड ठेवलं. एका काठीला चिकटवलेली Lemonade 25¢ per cup अशी पाटी लॉनवर उभारली.

छान! बापाने व लेकींनी माझ्या नकळत हे सर्व करायचं ठरवलं होतं.

एव्हाना गराज सेलला आलेली गिऱ्हाइकांची पहिली बॅच प्रत्येक वस्तूकडे दृष्टीक्षेप करत हिंडत होती. अँटिकवाल्या बायकांसारखी ही गिऱ्हाइकं प्रोफेशनल दिसली. दहा डॉलरची वस्तू डॉलरला मागणारी! मी

अगदी हेच एका यार्ड सेलमधे ५० सेंटस्‌ला घेतलं म्हणून बढाया मारणारी! असं तिनदा झाल्यावर माझं डोकं गरम झालं. "हे ५० सेंटस्‌ला विकण्यापेक्षा मी ते साल्व्हेशन आर्मीला देईन." मी रागाने म्हटलं.

एव्हाना नवरा कार घेऊन बेपत्ता झाला होता.

हळूहळू बाजारपेठ गिऱ्हाइकांनी फुलू लागली. घासाघीस होऊ लागली. मुली मधून मधून "यंव्‌ करू का? त्यंव करू का?" असे प्रश्न विचारू लागल्या.

तासाभरात नवरा ग्रोसरी घेऊन परतला. दुसऱ्या एका टेबलावर तो बार्बिक्यूची शेगडी पेटवू लागला. जवळच एका आइसबॉक्समधे त्याने आणलेले हॉट डॉगस्‌ व हॅमबरगरस्‌ ठेवले. व "Hot Dogs $4. Hamburgers $5." अशी पाटी लावली. मुली नुसत्या बापाभवती पिंगा घालत होत्या.

मोठी गप्प होती. पण धाकटीला राहवेना, "मम्मी, लेमोनेड आणि हॉट डॉग हॅमबरगर स्टँडचे सगळे पैसे आम्हाला मिळणार आहेत." माझ्या लक्षात आलं. पैशामुळे माझ्या लेकी आजच्या दिवस तरी बापाच्या झाल्या होत्या. नेहमीचं त्यांचं "मम्मी, मम्मी" आणि माझ्या भोवतीचं रिंगण आजच्या दिवसापुरतं थांबलं होतं.

बारा वाजता बापलेकींचा धंदा तेजीत आला. आमच्या घरासमोर मोठ्ठी गर्दी जमली. हॉट डॉगस्‌, हॅमबरगरस्‌ना लाईन लावून लोकं उभी होती. लिंडा आली आणि कधी नव्हे ते "तुझा नवरा कित्ती हुषार" असं दिलखुलास प्रशस्तिपत्रक देऊन गेली.

साडेबाराला एक मध्यमवयीन पोलिस आला, "हमरस्त्यावर आमच्या यार्ड सेलमुळे ट्रॅफिक जाम झाला की काय? म्हणून हा पोलिस गराज सेल गुंडाळायला लावणार वाटतं?" असे विचार माझ्या मनात चमकून गेले. पण नाही. पोलिस घराघरासमोरच्या सेलमधून वस्तू बघत हिंडू लागला. तोही खरेदी करायलाच आला होता.

मग "गराज सेलिंग" ही हॉबी असलेल्या एक बायकांचा कंपू उगवला. "हे घेऊया", "ते आपल्याला वापरलेल्या वस्तूंच्या दुकानात विकता येईल" असं बोलत त्या बायका इकडे तिकडे हिंडू लागल्या.

पाऊणला मी कंटाळले. नवऱ्याला म्हटलं, "मी इतरांच्या सेलमधे फेरी मारून येते. तू जरा आपल्या सेलवर लक्ष ठेव."

मी रस्त्यात हिंडत इतरांचे सेल बघू लागले. तेव्हढ्यात मला एक पुस्तकांचा ढिगारा दिसला. त्या ढिगाऱ्यात मी अडकले. २५ सेंटला दोन पुस्तकं विकत घेऊन परतले तोपर्यंत अर्धा तास उलटून गेला होता.

बघते तो काय माझा गराज सेल संपलेला! सर्व वस्तू नाहीशा झाल्या होत्या.

धाकटी धावत धावत आली. "मम्मी, तुझं सगळं काही डॅडीने त्या मोठ्या व्हॅनमधून आलेल्या बायकांना दहा डॉलरला विकून टाकलं." माझ्याविषयी तिला सहानुभूती वाटलेली दिसली. "डोंट फील बॅड. मी आज खूप पैसे मिळवतेय. तुला थोडेसे देईन" तिने मला आश्वासन दिलं. मी तिला थोड्या प्रयत्नाने उचलून घेत म्हटलं, "मुलगी असावी तर तुझ्यासारखी."

नवऱ्याला वाटलं होतं मी रागवीन. पण आज मला आनंदच झाला होता. मी घरात गेले आणि चहा पिऊन आरामखुर्चीवर पसरले. दहा मिनिटातच मला गाढ झोप लागली. मी जागी झाले तेव्हा रस्त्यावरचा कलकलाट मंदावला होता. नवरा शेजारच्या सोफावर पडून घोरत होता. मुली परत परत जमलेल्या नोटा व चिल्लर मोजत होत्या. मी डोळे उघडताच धाकटी म्हणाली, "मम्मी, आमची टोटल सारखी चुकतेय." मग तिने मला दहा डॉलर आणून दिले. "हे माझ्या हिश्श्यातले तुला!"

"थँक यू" मी म्हटलं. "डॅडी देईल तुम्हाला पैसे मोजून!" तोच दरवाजाची बेल वाजली. दोघींनी पैसे घाईघाईने एका बॉक्समधे भरले व आपल्या बेडरूममधे लपवले. मोठीने दरवाजा उघडला. तिचं मित्रमंडळ आलं होतं. त्यांच्याबरोबर ती बाहेर गेली. मी आळस देत किचनमधे गेले तर तिथे एक खेळण्यांनी भरलेलं बॉक्स पडलं होतं. मी धाकटीला विचारलं, "हे काय?"

"मम्मी, तू घरात गेल्यावर आम्ही दोघी सेलला गेलो. त्यावेळी सगळेजण टॉइज अगदी स्वस्तात विकत होते. ही बाहुली बघ ना. फक्त २५ सेंटला मिळाली. आणि हे पुस्तक….." बायका जशी लग्नाची खरेदी दाखवतात तशी ती गराज सेलची खरेदी दाखवायला लागली.

थोडक्यात घरातली जेवढी कचरण विकली गेली होती तेवढीच कचरण परत घरात आली होती.

“अखेरीस या श्रीमंत देशात गराज सेलचा हेतू तरी काय?” मी विचार करू लागले. “हळदीकुंकू करतात तसं सोशल, वस्तू रिसायकल, स्वस्तात काहीबाही मिळाल्याचं थ्रिल, मुलांना व्यापारामागची तत्त्वं शिकवण्याची संधी वगैरे वगैरे.”

मी शांतपणे स्वैपाकघरात बसून चहा पित विचार करत होते. तोच मोठी धावत घरात आली, “मम्मी, एव्हरीबडी सेज युअर डॅडी इज द बेस्ट.”

थोडक्यात आजच्या दिवसापुरता तरी माझा नवरा हिरो ठरला होता.

सहा महिन्यांनी मी उगीच अँटिकच्या दुकानात हिंडत असताना मला एक प्लॅटर व ट्रे दिसला. ते विकत घेण्याचा मला मोह झाला. मी दोन्ही उचलून निरखून पाहिलं. तेव्हा माझ्या लक्षात आलं. मी गराज सेलमधे विकलेली प्लॅटर आणि ट्रे त्या दुकानात पोचले होते.

मी किंमत पाहिली. प्लॅटर १५० डॉ.ला तर ट्रे २०० डॉ.ला विकायला होता.